# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधिक्षक
दिनांकः- १८/०२/२०१७

आरोपी व्यक्तीस उपस्थित राहण्यास फर्मावणारी उद्‌घोषणा
(फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ८२ पाहा)

ज्याअर्थी नामे धर्मा ऊर्फ धर्मराज निमाई रॉय वय- ३२ वर्ष, रा. चामोर्शी हनुमान वार्ड ता. चामोर्शी, जि. गडचिरोली यांचे विरूध्द महाराष्ट्र झोपडपट्टीदादा हातभट्टीवाले, औषधीद्रव्य विषयक गुन्हेगार धोकादायक व्यक्ती आणि दृकश्राव्य कलाकृतींचे बिनापरवाना प्रदर्शन करणारे व्यक्ती, (व्हिडीओ पायरेटस) वाळू तस्मर आणि अत्यावश्यक वस्तूंचा काळाबाजार करणारे व्यक्ती यांचे विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबतचा अधिनियम, १९८१ (सुधारणा २०१५) या कायद्यान्वये माझे कडिल स्थानबध्द आदेश क्रमांक कार्या-२/अका दंडा/कावि/२४२९/२०१६ दिनांक ३१/१२/२०१६ अन्वये स्थानबध्द करण्याचे आणि त्यास स्थानबध्द करून मध्यवर्ती कारागृह चंद्रपुर येथे दाखल करण्याचे आदेश निर्गमित केले होते. सदरचे स्थानबध्द आदेश इसम नामे धर्मा ऊर्फ धर्मराज निमाई रॉय यांचे वर बजावणे कामी पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, चामोर्शी यांना पोलीस अधिक्षक गडचिरोली यांच्या मार्फतीने आदेशित करण्यात आले होते.

ज्याअर्थी पोलीस अधिक्षक, गडचिरोली यांनी त्यांचे कार्यालयीन पत्र क्रमांक डी-२६/स्थागूशा/एमपीडीए प्रकरणे/२०१७-१२ दिनांक ०८/०२/२०१७ अन्वये कळविल्यानुसार पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, चामोर्शी यांनी नामे धर्मा ऊर्फ धर्मराज निमाई रॉय, वय- ३२ वर्ष, रा. चामोर्शी हनुमान वार्ड ता. चामोर्शी, जि. गडचिरोली यांचेवरील स्थानबध्द आदेश तामील करण्याकरीता सापडू शकत नाही, असे माझे निदर्शनास आणून दिले आहे. आणि ज्याअर्थी उक्त इसम धर्मा ऊर्फ धर्मराज निमाई रॉय वय- ३२ वर्ष, रा. चामोर्शी हनुमान वार्ड ता. चामोर्शी, जि. गडचिरोली हा

सदर आदेश/ वारंट बजावणी चुकविण्यासाठी तो गुप्तपणे वावरत आहे याबाबत माझी खात्री पटविण्यात आली आहे.

म्हणून, उक्त स्थानबध्द करावयाच्या ईसमास जबाब देण्यासाठी दिनांक १७ मार्च २०१७ रोजी येथे जिल्हादंडाधिकारी, गडचिरोली यांचे न्यायालयासमोर उपस्थित होण्यास फर्माविण्यात येत आहे, अशी याव्दारे उद्घोषणा करण्यात येत आहे.

आज दिनांक १६ फेब्रुवारी २०१७ रोजी